**शुक्रवार,**
**दि. ०६ जानेवारी २०२३**
**रोजी सकाळी ९ वा. -**
लहान गटाच्या भावगीताच्या स्पर्धा आणि दुपारी नाट्यगीताच्या स्पर्धा संपन्न होतील.

**शनिवार,**
**दि. ०७ जानेवारी २०२३**
**रोजी सकाळी ९.०० वा. -**
दुसऱ्या गटाच्या (वय वर्षे १५ ते ३५) भावगीताच्या स्पर्धा आणि दुपारी नाट्यगीताच्या स्पर्धा संपन्न होतील.

**रविवार,**
**दि. ०८ जानेवारी २०२३**
**रोजी सकाळी ९.०० वा. -**
तिसऱ्या गटाच्या (वय वर्षे ३६ ते ५५) भावगीताच्या स्पर्धा आणि दुपारी नाट्यगीताच्या स्पर्धा संपन्न होतील.

**वय वर्षे ९ ते १४ या वयोगटासाठी भावगीत व नाट्यगीतासाठी पारितोषिके**
प्रथम क्र.-रु. ५,०००/-, द्वितीय क्र.-रु. ३,०००/-, तृतीय क्र.-रु. २,०००/-

**वय वर्षे १५ ते ३५ वयोगटासाठी भावगीत व नाट्यगीतासाठी पारितोषिके**
प्रथम क्र.-रु.१०,०००/-, द्वितीय क्र.-रु. ७,०००/-, तृतीय क्र.-रु. ५,०००/-

**वय वर्षे ३६ ते ५५ वयोगटासाठी भावगीत व नाट्यगीतासाठी पारितोषिके**
प्रथम क्र.-रु. १०,०००/-, द्वितीय क्र.-रु. ७,०००/-, तृतीय क्र.-रु. ५,०००/-

**याशिवाय प्रत्येक गटासाठी २ उत्तेजनार्थ रोख बक्षिसे देण्यात येतील.**

**तसेच स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ**
रविवार, दि. ०८ जानेवारी २०२३ रोजी सायं. ६.०० वाजता स्पर्धास्थानीच संपन्न होईल.

**सहयोग**



**नाट्यगीत स्पर्धा पारितोषिक**
**डॉ. वि. ह. वझे**
(संस्थेचे माजी अध्यक्ष)
स्मृतिप्रित्यर्थ
**डॉ. श्री. गिरीश वझे**
यांचे तर्फे


**भावगीत स्पर्धा पारितोषिक**
**कर्नल ए. बी. जाधव**
(संस्थेचे माजी अध्यक्ष)
स्मृतिप्रित्यर्थ
**डॉ. सौ. हेमा अजित चांदोलकर**
यांचे तर्फे

श्री. रवी व श्री. राजीव गोएंका यांच्यातर्फे **कै. विमलादेवी वासुदेवजी गोएंका** यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भावगीत व नाट्यगीत स्पर्धा पारितोषिके

**स्पर्धेच्या संदर्भात अथवा इतर कोणत्याही माहितीसाठी**

| प्रा. सतीश कुलकर्णी | डॉ. शीतल धर्माधिकारी | प्रा. गोविंद पैठणे | सौ. गौरी कुलकर्णी | प्रसाद कुलकर्णी |
| --- | --- | --- | --- | --- |
| ९३२६४९९९१० | ९३२६००९३८६ | ८०८७५१२५११ | ९४२२०१३७५८ | ९४२०५८३६९३ |

यांचेशी संपर्क साधावा.



दि न्यू एज्युकेशन सोसायटी कोल्हापूर संचालित,

# मदनमोहन लोहिया सांस्कृतिक मंच

आयोजित

# राज्यस्तरीय नाट्यगीत व भावगीत गायनस्पर्धा २०२३

**वर्ष ९ वे**



रसिकहो..!

दि न्यू एज्युकेशन सोसायटीने गेल्या १०२ वर्षांत शिक्षणक्षेत्राबरोबरच संगीत, नाट्य, साहित्य, समाजसेवा अशा अनेकविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. कोल्हापूरच्या संगीत रंगभूमीला रसिकाग्रणी मदनमोहन लोहिया यांच्या रुपाने परीसस्पर्श लाभला व संगीत रंगभूमी खऱ्या अर्थाने उजळून निघाली. संगीत रंगभूमी हा लोहियाजींचा श्वास होता यातूनच त्यांनी जीवनकल्याण नावाची संस्था स्थापन करुन त्या माध्यमातून अनेक दर्जेदार व अभिजात अशा नाट्य प्रयोगांचे सादरीकरण केले. संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. वि. ह. वझे व संस्थेच्या नियामक व विशस्त मंडळाचे अध्यक्ष मा. विनोदकुमार लोहिया यांनी लोहियाजींच्या नाट्यक्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेतली व ती परंपरा पुढे चालू रहावी तसेच त्यांच्या पवित्र स्मृतीस उजाळा मिळावा या हेतूने २००४ साली मदनमोहन लोहिया सांस्कृतिक मंचाची स्थापना केली.कै. राम जोशी व डॉ. शीतल धर्माधिकारी यांच्या संगीत दिग्दर्शनातून प्रारंभी संगीत सौभद्र मधील दोन प्रवेशांचे सादरीकरण करण्यात आले. व पुढे २००५ साली संपूर्ण संगीत सौभद्र मोठ्या दिमाखात रंगमंचावर आले. मंचाला प्रगतीपथावर नेण्यासाठी डॉ. ज. ल. नागावकर व प्रा. सतीश कुलकर्णी यांचे विशेष मार्गदर्शन तसेच संस्थेच्या नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष हेमराज सामाणी, संस्थेचे सचिव जी. एन्. कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संगीत सौभद्रने सगळीकडे रसिकांची वाहवा मिळवत ८८ व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनातही रसिकांची मनं जिंकली. नवी दिल्ली येथे आयोजित ३५ व्या अखिल भारतीय संगीत नाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकासह ५० हून अधिक बक्षिसं मिळविण्याचा विक्रम संगीत सौभद्रने केला. यानंतर मंचाने संगीत स्वयंवर या पौराणिक व अजरामर नाटकाचे सादरीकरण केले. तसेच नटसम्राट बालगंधर्व यांनी अजरामर केलेल्या दहा नायिका अर्थात दशनायिका दर्शन या अनोख्या कार्यक्रमाचेही सादरीकरण केले. गेल्या ८ वर्षापासून मंचाच्या वतीने संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. या महोत्सवांतर्गत नवोदित कलावंतांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी नाट्यगीत व भावगीत स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. आजवर या महोत्सवात सौ. आशा खाडिलकर, सौ. आरती अंकलीकर - टिकेकर, पद्मश्री सौ. पद्मजा फेणाणी जोगळेकर, पं.विश्वनाथ कान्हेरे, श्री. संजय देशपांडे, सौ. मंजुषा कुलकर्णी - पाटील, श्रीरंग भावे, यांनी आपली कला सादर करून ससिकांची मने जिंकली. संस्थेच्या विविध शाळातील प्रतिथयश विद्यार्थी मंगला भट्ट (हैद्राबाद), डॉ. अश्विनी चांदेकर, स्वरुपा बर्वे, सौरभ शिपुरकर, प्रणव मोघे, आशय कुलकर्णी व प्रल्हाद जाधव यांच्या सादरीकरणानेही महोत्सवाची उंची वाढवली. महोत्सवाच्या नियोजनात पं. राजप्रसाद धर्माधिकारी यांचे सहकार्य लाभत असून सचिन जगताप व केदार गुळवणी यांचेही सांगीतिक योगदान मोलाचे आहे. या मंचासाठी संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष नितीन वाडीकर, सहसचिव प्रभाकर हेरवाडे, प्राचार्य एस्. एस्. चव्हाण, प्रा. गोविंद पैठणे, डॉ. शीतल धर्माधिकारी, प्रा. श्रीमती स्नेहा फडणीस, सुधाकर अतिग्रे, प्रसाद कुलकर्णी तसेच सर्व शिक्षक, कलाशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे उत्स्फूर्त सहकार्य लाभते. सन २०२० रोजी संपन्न झालेल्या संगीत महोत्सवामध्ये ख्यातनाम गायक प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन व प्रसिध्द निवेदक विघ्नेश जोशी यांच्या 'मर्म बंधातली ठेव' याही कार्यक्रमाला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. चालू वर्षी या स्पर्धा मोठ्या उत्साहात आयोजित करण्याचा आमचा मानस आहे. या स्पर्धेत जास्तीत जास्त नवोदित संगीत साधकांच्या सहभागासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

धन्यवाद !

❋ आपला स्नेहांकित ❋

**विनोदकुमार लोहिया**

**अध्यक्ष,मदनमोहन लोहिया सांकृतिक मंच, कोल्हापूर.**

- सदर स्पर्धेत सहभागी होणारा स्पर्धक हा हौशी कलावंत असावा.
- सदरची स्पर्धा ९ ते १४, १५ ते ३५ आणि ३६ ते ५५ या वयोगटातील कलावंतासाठी खुली आहे.
- भावगीत व नाट्यगीत स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक विभागासाठी रू. २००/- प्रवेश फी राहिल.
- प्रत्येक गीतासाठी वेगळी प्रवेशिका भरावी लागेल.
- स्पर्धेसाठी एका गटात ३० पेक्षा जास्त प्रवेशिका आल्यास प्रथम प्राथमिक फेरी घेऊन स्पर्धकांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात येईल.
- जर काही अपरिहार्य कारणामुळे स्पर्धकाला स्पर्धेच्या ठिकाणी यायला उशीर होत असेल तर त्याची पूर्वकल्पना स्पर्धकाने देणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धेच्या नियोजनाच्या दृष्टिने किती वाजता आपण येणार आहोत हेही सांगणे बंधनकारक आहे.
- स्पर्धेसाठीची प्रवेशिका भरून पोस्टाने पाठवता येईल. अथवा संस्थेच्या www.neskolhapur.com या वेबसाईट वरून ऑनलाईन प्रवेशिका भरता येईल. इंटरनेटवरून अथवा पोस्टाने प्रवेशिका भरल्यास प्रवेश फी रू २००/- आय. डी. बी. आय. बँकेच्या दि न्यू एज्युकेशन सोसायटी, IFSC CODE- IBKL०००००६३४ व बचत खाते क्रमांक ६३४१००१००२७३७८ वर जमा करावी व स्पर्धेस येताना पैसे भरणा पावती सोबत आणावी.
- स्पर्धेत भावगीत/नाट्यगीत सादर करणेसाठी तबला, पेटी, टाळ व साथीदारांची सोय संयोजकांच्या वतीने करणेत येईल. स्पर्धकाला स्वत:ची वाद्ये व साथीदार हवे असतील तर ती व्यवस्था स्पर्धकांनी स्वखर्चाने करावयाची आहे. वर नमूद केलेल्या वाद्याव्यतिरिक्त नाट्यसंगीतासाठी फक्त तंबोरा किंवा इलेक्ट्रोनिक्स तानपुरा वापरता येईल. स्पर्धकास स्वत: वाद्य वाजवून गीत सादर करता येणार नाही.
- स्पर्धेच्या प्रवेशिकेत स्पर्धकांनी सादर करणार असलेल्या तीन नाट्यगीतांचे/भावगीतांचे पर्याय द्यावेत.
- स्पर्धेच्या वेळी परीक्षक सुचवतील ते नाट्यगीत/भावगीत सादर करावे लागेल.
- नाट्यगीत गायनासाठी ७ मिनिटाचा तर भावगीत गायनासाठी ५ मिनिटाचा वेळ दिला जाईल.
- गतवर्षीच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त स्पर्धकांना या वर्षीच्या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.
- स्पर्धेच्या दिवशी सर्व स्पर्धकांची भोजन व्यवस्था संयोजन समितीकडून केली जाईल. कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्राबाहेरील परगावच्या स्पर्धकांना एकवेळचे साध्या एस. टी. चे भाडे संयोजकांच्या वतीने दिले जाईल. तसेच एका कुटुंबीयासह स्त्री स्पर्धकांची व केवळ पुरुष स्पर्धकांची निवास व्यवस्था संयोजकांकडून केली जाईल. सदरची निवास व्यवस्था दि. ५ जानेवारी २०२३ रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून दि. ८ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत उपलब्ध होईल.
- स्पर्धकांसोबत आलेल्या जादा व्यक्तिसाठी रक्कम भरून निवास व्यवस्था केली जाईल. परंतु त्या संबंधीची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. स्पर्धेसाठीची प्रवेशिका प्रत्यक्ष, पोस्टाने अथवा इंटरनेटद्वारे दि. ४ जानेवारी २०२३ पूर्वी पोहचणे आवश्यक आहे.
- स्पर्धेत प्रवेश देण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार संयोजन समितीने राखून ठेवला आहे.
- परीक्षकांनी दिलेला निर्णय स्पर्धकांस बंधनकारक राहील.
- स्पर्धेच्या नियम व अटींमध्ये बदल करण्याचा किंवा त्या शिथिल करण्याचा अधिकार संयोजन समितीने राखून ठेवला आहे .

❋ स्पर्धेचे ठिकाण ❋

**राम गणेश गडकरी सभागृह,**

**प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल प्रांगण, न्यू महाद्वार रोड, खरी कॉर्नर, कोल्हापूर.**

**फोन: ०२३१- २६२५२२८ वेबसाईट : www.neskolhapur.com**